# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक : - २६ नोव्हेंबर २०२४

---

जळगाव दि.२६ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात भारतीय संविधनाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त दि. २६ नोव्हेंबर रोजी कुलगुरु प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या प्रमुख उपस्थितीत वाजता भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.

यावेळी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांचेसह शैक्षणिक प्रशाळांचे संचालक, शिक्षक सर्व प्रशासकिय विभागांचे प्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा.जयेंद्र लेकुरवाळे यांनी प्रास्ताविक केले. सदर कार्यक्रम विद्यापीठाच अधिसभागृहात आयोजित करण्यात आला.

**सामाजिक शास्त्रे प्रशाळेत व्याख्यान**

विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्र प्रशाळेत देखील भारतीय संविधनाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त दि. २६ नोव्हेंबर रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन व जळगाव येथील समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त योगेश पाटील यांचे व्याख्यान झाले. यावेळी श्री.योगेश पाटील यांनी भारतीय संविधानाने समाजातील सर्व जाती धर्माच्या घटकांना विकासाची समान संधी दिल्यामुळे समाजात सामाजिक न्यायाची भावना प्रस्तापित झाली आहेत.सर्व नागरीकांनी संविधानाप्रमाणे वर्तन व आचार धर्म पाळला पाहिजे. यावेळी संचालक डॉ.अजय पाटील,डॉ.आंबेडकर विचारधारा विभागाचे प्रमख प्रा.राकेश रामटेके, रासेयो संचालक डॉ. सचिन नांद्रे, विभाग प्रमुख डॉ.उमेश गोगडीया व डॉ.कविता पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रास्ताविक डॉ.उमेश गोगडीया यांनी केले तर सुत्रसंचालन डॉ.विजय घोरपडे यांनी केले. आभार प्रा.डॉ.शंकर यशोध यांनी मानले यावेळी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.२६ (प्रतिनीधी) : विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाप्रती निर्माण झालेली उदासिनता दुर करण्यासाठी शिक्षण प्रक्रियेच्या माध्यमातून अनुभवजन्य शिक्षण उपलब्ध करुन दिले पाहिजे असे प्रतिपादन प्र-कुलगुरु एस.टी.इंगळे यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेअंतर्गत शिक्षणशास्त्र विभाग व क्षमता निर्मिती केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने हॅन्डस ऑन एक्सपीरियन्स ऑन टिचींग एड् : टेक्नॉलॉजी इंटिग्रेशन या दोन दिवसिय कार्यशाळेत प्रा.इंगळे बोलत

होते. यावेळी प्रा.इंगळे पुढे म्हणालेकी खाजगीकरण आणि स्वायत्तता यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर खुप मोठा परीणाम झाला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची उद्दीष्टे पुर्ण करण्यासाठी अशा विविध कार्यशाळा आयोजीत करुन त्यामाध्यमातून विद्यार्थ्यांना गुणवत्ता पुर्ण शिक्षण उपलब्ध करुन दिले पाहिजे असे ते म्हणाले. यावेळी मंचावर संचालक डॉ.मनिषा इंदाणी, योगशास्त्र विभाग प्रमुख अभि.राजेश पाटील, श्री.आर.एस.पाटील, डॉ.संतोष खिराडे उपस्थित होते. प्रारंभी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. सुत्र संचालन डॉ.स्वाती तायडे, तर आभार प्रदर्शन डॉ.रणजीत पारधे यांनी केले.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात नुतन मराठा अध्यापक विद्यालयातील प्रा.आर.एस.पाटील यांनी शैक्षणिक साहित्य म्हणून अध्ययन अध्यापनात वापरल्या जाणाऱ्या विविध साधनांचा परिचय करुन देत प्रत्येक साधनाच्या निर्मितीची प्रक्रिया समजावून सांगितली व विद्यार्थ्यांकडून करुन घेतले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.लिना चौधरी, प्रा.गितांजली भंगाळे, लिंटा चौधरी, संदीप वाघ व इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ.सुनील पाटील

जनसंपर्क अधिकारी